# लवचीकतेमुळे करोनाशी दोन हात : संन्याल



नागपूर : लवचीकता आणि बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेण्यामुळे भारत करोनाकाळात समर्थपणे मुकाबला करू शकला, असे मत पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य संजीव संन्याल यांनी व्यक्त केले. आयआयएम, नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात ते ' अनिश्चित काळातील धोरणनिश्चिती' या विषयावर बोलत होते. एमबीएच्या विद्यार्थ्यांशी बोलताना त्यांनी करोनाकाळातील कठीण परिस्थितीतील धोरणनिश्चिती, सरकारसमोरील आव्हाने, त्यावर शोधण्यात आलेले उपाय याबद्दल माहिती दिली. सध्या जगात सर्वत्र अनिश्चितता आहे. मात्र, विविध संकटे उत्पन्न झाल्याने प्रत्येक काळातच जगाने अशी अनिश्चितता अनुभवली आहे, असेही संन्याल म्हणाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही दिली. आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, मुख्य प्रशासकीय अधिकारी मकरंद अलूर, प्राध्यापक आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.